# University of Mumbai

क्र. एएएमएस(युजीएस)/आयसीसी/२०२२–२३/९७

विषय :–कोविड–१९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अभ्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात

संदर्भ :– १) शासन पत्र क्र. संकीर्ण–२०२२/कोविड–१९/मवि–१/१०९६०, दिनांक २५/८/२०२२
२) शासन पत्र संकिर्ण– २०२२/प्र.क्र. २१७/विशी–३, दिनांक २४/८/२०२२

## परिपत्रक :–

विद्यापीठाच्या संलग्नीत/संचालित, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, संचालक, उप-परिसर (ठाणे, रत्नागिरी, कल्याण) यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कोविड-२०२० कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्याबाबत विद्यापीठ स्तरावर तातडीने कार्यवाही करणेबाबत संदर्भीय शासन पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. तसेच संदर्भीय शासन पत्रात उपक्रमाची उद्दिष्टे व उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती नमुद केलेली आहे. सुलभ संदर्भासाठी संदर्भीय शासन पत्र सोबत जोडले आहे.

आपणांस सूचित करण्यात येते की, उपरोक्त बाबत कार्यवाही करून याबाबतचा अहवाल उपकुलसचिव, विद्याविषयक प्राधिकरण सभा व सेवा विभाग, रुम नं.१२८, यांना खालील नमुन्यात पाठविण्यात यावा :-

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव/ विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे नाव | जिल्हा | अभ्यासक्रमाचे नाव | महाविद्यालयाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मुंबई – ४०० ०३२
३० ऑगस्ट, २०२२

(डॉ. विनोद पाटील)
प्र. कुलसचिव

प्रति,

विद्यापीठाच्या संलग्नीत/संचालित, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक, प्रमुख, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, संचालक, उप-परिसर (ठाणे, रत्नागिरी, कल्याण).

प्रत माहितीसाठी रवाना:-

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
२. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र, पुणे - १.
३. स्वीय सहायक, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट - ४०० ०३२.
४. स्वीय सहायक, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट - ४०० ०३२.
५. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट - ४०० ०३२.

Reg/ICD/2022-23/310

DR (AAM)
Vatul
2818

महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,

मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

Web : www.dhepune.gov.in, E-Mail : prash.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१२४६३९, २६१२६९४० फॅक्सनं.०२०/२६१११९५३

जा.क्र.संकीर्ण-२०२२/कोविड-१९/मवि-१/ 10998 दिनांक २५/०८/२०२२

25 AUG 2022

प्रति,

१.मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
२.मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३.मा.कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
४.मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड

**विषय:- कोविड-१९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात.**
संदर्भ:- शासन पत्र संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२१७/विशि-३, दिनांक २४/०८/२०२२.

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी कोविड-१९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठात "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्याबाबत विद्यापीठ स्तरावर तातडीने कार्यवाही करणेबाबत संदर्भीय शासन पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. तसेच संदर्भीय शासन पत्रात उपक्रमाची उद्दिष्टे व उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती नमुद केलेली आहे. **सुलभ संदर्भासाठी संदर्भीय शासन पत्र संलग्नित केलेले आहे.**

सदरहू उपक्रम यशस्वीरित्या राबविण्याची संपुर्ण जबाबदारी संबधीत विद्यापीठाच्या प्र.कुलगूरु यांची राहील. विद्यापीठांनी आपल्या विद्यापीठाच्या अंतर्गत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाच्या बाबतीत केलेली कार्यवाही बाबतचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

प्रत-सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१
Email ID:- vishi3-hted@mah.gov.in hted.vishi3-mh@gov.in

क्रमांक:-संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२१७/विशि-३ दिनांक:- २४ ऑगस्ट, २०२२

प्रति,

१. मा. कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे
२. मा. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३. मा. कुलगुरु, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
४. मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड

विषय:- कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात.

संदर्भ:- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२२/ कोविड-१९/मवि-१/१०८१२, दि. २२ ऑगस्ट, २०२२

महोदय/ महोदया,

कोविड-१९ साथीच्या कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता त्यांचे शैक्षणिक नुकसान / शैक्षणिक कमी भरुन काढण्याच्या दृष्टीने सेतू अध्ययन उपक्रम राबविण्याबाबत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु यांच्यासमवेत दि. २०/०८/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीत सर्वच कुलगुरुंनी असे नमूद केले की, ऑनलाईन पध्दतीने अध्ययन-अध्यापन प्रकियेमध्ये शिक्षणाचा अपेक्षित दर्जा राखता येण्यामध्ये काही मर्यादा आल्या असल्याचे निरीक्षण नोंदविले असून विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययननिष्पत्ती साध्य झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच सदरहू घटकांसाठी अधिक अध्यापनाची आवश्यकता असल्याचे कुलगुरुंनी नमूद केले. सदर बाब लक्षात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमधील उणीव दूर करण्यासाठी, विद्यार्थ्यांची शैक्षणिक कमी भरुन काढण्यासाठी Bridge Course असावा अशी आवश्यकता सर्वच कुलगुरुंनी व्यक्त केली. काही विद्यापीठांनी याबाबत कार्यवाही सुरु केली असल्याचे सुध्दा नमूद केले. तथापि, सर्व विद्यापीठांमध्ये समान कार्यपध्दती असावी यादृष्टीने संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता "सेतू अध्ययन उपक्रम" राबविण्यासंदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत सदर बैठकीत निर्देश देण्यात आले होते. त्यासअनुसरुन संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भिय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत असून त्यानुसार तातडीने विद्यापीठ स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

**उपक्रमाचे नाव :** कोविड १९ कालावधीमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता सेतू अध्ययन उपक्रम

१. पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची सत्र व विषयनिहाय प्रत्यक्ष अध्यापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांची निवड करणे.

२. यासाठी निदानात्मक चाचणीचे आयोजन करुन चाचणीच्या निष्कर्षांचे आधारे घटक निश्चिती करणे.

३. सदरहू चाचणीच्या विश्लेषणावरुन उपायात्मक प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन उपक्रम प्रात्यक्षिकांसह राबविणे.

४. उपायात्मक अध्ययन-अध्यापन करुन विद्यार्थ्यांचा संबंधित विषयाचा अध्ययन स्तर उंचावणे.

**उपक्रम राबविण्याची कार्यपध्दती :**

१. सदर उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला सर्व विषयांसाठी राबविण्यात यावा. सदर उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असेल.

२. सदर उपक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच प्रत्येक विषय शिक्षकाची राहील.

३. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व विभाग प्रमुख यांनी सदर उपक्रमासाठी स्वतंत्र समिती गठीत करावी.

४. पूर्वज्ञानावर आधारित नवीन सत्रातील विषयज्ञान आकलन करण्यासाठी विषयज्ञान, संकल्पना स्पष्टता, आकलन, उपयोजन, पृथःकरण/ संश्लेषण आणि टीकात्मक मूल्यमापन या स्तरांवर आधारित पूर्वज्ञान तपासणारी निदानात्मक चाचणी आयोजित करावी.

५. निदानात्मक चाचणी ही संबंधित विषयाच्या अध्यापकाने सदरहू विषयासाठी आवश्यक असणाऱ्या पूर्वज्ञानावर तयार करावी. ज्यायोगे सदरहू चाचणीच्या निकालाद्वारे विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करणे सुलभ होईल.

६. विद्यार्थ्यांना आकलन न झालेले घटक निश्चित करुन सदरहू घटकासाठी गरजेप्रमाणे अध्यापन तासिकांचे वर्ग व अध्यापन पध्दतीचे नियोजन करुन समृध्द उपायात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रमाची योजना तयार करावी. यामध्ये ज्या विषयांना प्रात्यक्षिक (Practicals) असतात अश्या प्रात्यक्षिकांचा सुध्दा समावेश असावा.

७. प्रत्येक विषयासाठी अध्यापनाच्या आवश्यकतेनुसार किमान ०५ तासिका असाव्यात.

८. सदरहू सेतू अध्ययन उपक्रमाचे वेळापत्रक विभाग समिती / महाविद्यालयांनी तयार करुन वेळापत्रकाची अंमलबजावणी विभाग / महाविद्यालय यांच्या स्तरावर सत्र प्रारंभी तात्काळ करावी. ज्या ठिकाणी यापूर्वी सत्र सुरु झाले आहे त्या ठिकाणी पुढील अध्यापन सुरु करण्यापूर्वी करण्यात यावे.

९. पूर्वज्ञान समृध्द होण्यासाठी सदरहू घटकांना अनुरुप असे संदर्भ ग्रंथ, साहित्य, वेब साहित्य इत्यादी बाबतची यादी उपलब्ध करुन देण्यात यावी.

१०. उपायात्मक अध्यापन प्रक्रियेनंतर निदानात्मक कसोटीचे आयोजन करुन अपेक्षित ज्ञान आकलन झाले असल्याची खातरजमा करण्यात यावी.

११. सदरहू उपक्रमात समाधानकारकरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

१२. सदर उपक्रम प्रथम सत्रासाठी १५ ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्यात यावा. द्वितीय सत्र सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे.

. सदर उपक्रम उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण मधील सर्वच अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात यावा. यासाठी कोणताही स्वतंत्र निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

आपला,

(अ.म.वाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

त:-

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
४. निवडनस्ती (विशि-३)